# स्थितप्रज्ञ दर्शन

**अर्जुन म्हणाला**

स्थिरावला समाधींत स्थित-प्रज्ञ कसा असे
कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा ।

**श्री भगवान म्हणाले**

कामना अंतरातील सर्व सोडूनि जो स्वयें
आत्म्यांत ची असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला ।

नसे दुःखात उद्वेग सुखाची लालसा नसे
नसे तृष्णा भय क्रोध तो स्थित-प्रज्ञ संयमी ।

सर्वत्र जो अनासक्त बरें वाईट लाभतां
न उल्हांसे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली ।

घेई ओढूनि संपूर्ण विषयांतूनि इंद्रियें
जसा कासव तो अंगे तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ।

निराहार-बळे बाह्य सोडी विषय साधक
आंतील न सुटे गोडी ती जळे आत्म-दर्शनें ।

करीत असता यत्न ज्ञात्याच्या हि मनास ही
नेती खेंचूनि वेगानें इंद्रियें दांडगी चि की ।

त्यांस रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण
इंद्रियें जिंकिलीं ज्याने त्याची प्रज्ञा स्थिरावली ।

विषयांचे करी ध्यान त्यास तो संग लागला
संगांतूनि फुटे काम क्रोध कामांत ठेविला ।

क्रोधांतूनि जडे मोह मोहाने स्मृति लोपली
स्मृति-लोपें बुध्दी-नाश म्हणजे आत्म-नाश चि ।

राग-द्वेष परी जातां आलीं हातांत इंद्रियें
स्वामित्वें विषयीं वर्ते त्यास लाभे प्रसन्नता ।

प्रसन्नते पुढे सर्व दुःखे जाती झडूनियां
प्रसन्नतेनें बुध्दीची स्थिरता शिघ्र होतसे ।

अयुक्तास नसे बुध्दी त्यामुळें भावना नसे
म्हणूनि न मिळे शांति शांतीविण कसें सुख ।

इंद्रियें वर्तता स्वैर त्यांमागे मन जाय जें
त्याने प्रज्ञा जशी नौका वाऱ्याने खेचली जळीं ।

म्हणूनि इंद्रियें ज्यानें विषयांतूनि सर्वथा
ओढूनि घेतलीं आंत त्याची प्रज्ञा स्थिरावली ।

सर्व भूतांस जी रात्र जागतो संयमी तिथें
सर्व भूतें जिथे जागीं ज्ञानी योग्यास रात्र ती ।

न भंग पावे भरतां हि नित्य
समुद्र घेतो जिरवूनि पाणी
जाती तसे ज्यांत जिरवूनि भोग
तो पावला शांति न भोग-लुब्ध ।

सोडूनि कामना सर्व फिरे होऊनि निःस्पृह
अहंता ममता गेली झाला तो शांतिरुप चि ।

अर्जुना स्थिति ही ब्राम्ही पावतां न चळे पुन्हां
टिकूनि अंत-काळीं हि ब्रम्ह-निर्वाण मेळवी ।

*(गीताई – अध्याय दुसरा)*